आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
६ नोव्हेंबर २०२५ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातलं मतदान सुरु/ सकाळी ११ वाजेपर्यंत २७ पूर्णांक ६५ शतांश टक्के मतदान

- इक्षक टेहेळणी जहाज आजपासून भारतीय नौदलाच्या सेवेत

- गाझा पट्टीत हमासविरोधातली कारवाई सुरूच ठेवणार असल्याची इस्राएलची घोषणा

- ऑस्ट्रेलिया-भारत टीट्वेंटी क्रिकेट सामन्यात नाणेफेक जिंकून ऑस्ट्रेलियाचा प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय

**आणि**

- इजिप्तमध्ये आजपासून सुरू होणाऱ्या आयएसएसएफ जागतिक अजिंक्यपद नेमबाजी स्पर्धेत मनू भाकरच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ सहभागी होणार

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातल्या मतदानाला आज सात वाजता सुरुवात झाली. १८ जिल्ह्यात मिळून १२१ मतदारसंघामध्ये १ हजार ३१४ उमेदवारांचं भवितव्य आज मतदान यंत्रात बंद होईल. सकाळी ११ वाजेपर्यंत २७ पूर्णांक ६५ शतांश टक्के मतदान झालं . सर्वात जास्त मतदानाची नोंद बेगुसरायमधे ३० पूर्णांक ३७ शतांश टक्के इतकी झाली. ऐकूया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून,

व्हॉईस कास्ट-

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

६ नोव्हेंबर २०२५ - गुरुवार

*(बिहार विधानसभेसाठी आज पहिल्या टप्प्याचं मतदान १२१ जागांवर होत असून बिहारची राजधानी पाटणा, वैशाली, नालंदा, भोजपूर, मुंगेर, सारण, सिवान, बेगुसराय, लखीसराय, गोपाळगंज, मुझफ्फरपूर, दरभंगा, मधेपुरा आणि सहरसा या मतदारसंघांचा त्यात समावेश आहे. सुरक्षेच्या कारणास्तव सिमरी बख्तियारपूर, महिषी, तारापूर, मुंगेर, जमालपूर आणि सूर्यगढ विधानसभा मतदारसंघातल्या ५६ मतदान केंद्रांवर संध्याकाळी पाच वाजेपर्यंतच मतदान होणार आहे. मतदान शांत, मुक्त आणि निःपक्षपाती वातावरणात पार पडण्यासाठी कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. सर्व ४५ हजार ३४१ मतदान केंद्रांवरून वेबकास्टिंग केले जाईल. पाटणा इथल्या निवडणूक कार्यालयामध्ये एक विशेष नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. मतदानादरम्यान अनुचित प्रकार घडल्याचं वृत्त नाही.*

*बिहारचे मुख्यमंत्री नीतीशकुमार, यांनी बख्तियारपूर इथं, तर उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनी मुंगेर इथं मतदान केलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नागरिकांनी उत्साहाने मतदान करावं असं आवाहन केलं असून, पहिल्यांदाच मतदान करणाऱ्या युवा मतदारांना शुभेच्छा दिल्या आहेत.)*

दरम्यान बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातल्या प्रचाराने वेग घेतला आहे. दोन्ही टप्प्यांची मतमोजणी येत्या १४ नोव्हेंबरला होणार आहे. दरम्यान बिहार निवडणुकीची प्रक्रीया पाहण्यासाठी ७ वेगवेगळ्या देशातल्या १६ प्रतिनिधींनी निवडणूक सज्जतेची पाहणी केली.

**<><><><><>**

भारतीय नौदलाच्या जलक्षेत्र सर्वेक्षणाची क्षमता वृद्धिंगत करणारं इक्षक टेहेळणी जहाज आजपासून औपचारिकरित्या नौदलाच्या सेवेत दाखल होत आहे. नौदल प्रमुख अॅडमिरल दिनेश त्रिपाठी यांच्या उपस्थितीत हा समारंभ होणार आहे. इक्षक दक्षिण नौदल कमांड अंतर्गत तैनात होत असून त्याचा बहुतांश भाग देशांतर्गत उत्पादन सामुग्रीतून तयार झाला आहे. जहाजं, बंदरे आणि जलमार्ग, किनारपट्टी आणि खोल समुद्रातल्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी या जहाजाची निर्मिती केली आहे.

**<><><><><>**

भारत आणि मॉरिशसच्या नागरिकांमधले संबंध दृढ करण्यासाठी, भारतीय नौदलाच्या आयएनएस सावित्री या युद्धनौकेनं आज मॉरिशसची राजधानी पोर्ट

लुईस इथल्या आपल्या मुक्कामा दरम्यान, पर्यटकांचं स्वागत केलं. यावेळी भारतीय नौदलाची कार्यक्षमता, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि समृद्ध वारसा प्रदर्शित करण्यात आला. भारत आणि मॉरिशस दरम्यानचं परस्पर सामंजस्य वाढवणं, सागरी कूटनीतिला चालना देणं आणि परस्परांच्या नागरिकांमधले संबंध मजबूत करणं, हे या उपक्रमाचं उद्दिष्ट आहे. नैऋत्य हिंद महासागर प्रदेशात दीर्घ पल्ल्याच्या परिचालन तैनातीचा भाग म्हणून, आयएनएस सावित्री १ नोव्हेंबर रोजी पोर्ट लुईस इथं पोहोचलं.

**<><><><><>**

वंदे मातरम् या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवाचं उद्घाटन उद्या दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. सांस्कृतिक मंत्रालयाच्या वतीनं याचं आयोजन करण्यात येणार असून, स्वातंत्र्य चळवळीला प्रेरणा देणारं हे गीत बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी दीडशे वर्षांपूर्वी लिहीलं होतं. देशभरात या निमित्त वर्षभर विविध कार्यक्रम होणार आहेत. उद्याच्या कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते विशेष टपाल तिकीट आणि नाण्याचं प्रकाशन होणार आहे.

**<><><><><>**

इस्राएलचं लष्कर गाझा पट्टीत आपल्या ताब्यातल्या प्रदेशात हमासविरोधातली कारवाई आणि त्यांनी बनवलेली भुयारं नष्ट करण्याचं काम सुरूच ठेवणार असल्याचं इस्रायलचे संरक्षण मंत्री इस्रायल काट्झ यांनी म्हटलं आहे. राफाहमध्ये अडकलेल्या हमासच्या दहशतवाद्यांना गाझामध्ये त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या भागात परतण्याची परवानगी द्यावी, असं आवाहन अमेरिकेनं केलं होतं. त्यानंतर काट्झ यांनी ही भूमिका जाहीर केली. गाझा पट्टीचं नि:शस्त्रीकरण करणं, तसंच मृत ओलिसांचे मृतदेह परत मिळवणं हे इस्राएलचं उद्दिष्ट असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

युरोपियन युनियनच्या सदस्यांनी युरोपियन हवामान कायद्यात सुधारणा करण्याबाबतचा करार केला असून, त्यानुसार युरोपियन युनियन आणि सदस्य राष्ट्रांसाठी २०३५ च्या कार्बन उत्सर्जन कपात उद्दिष्टांमध्ये सुधारणा केली आहे. युरोपियन युनियनच्या परिषदेनं आपल्या प्रसिद्धीपत्रकात हे घोषित केलं आहे. या करारानुसार, परिषदेनं १९९० सालच्या तुलनेत, २०४० मध्ये कार्बन उत्सर्जन पातळीत ९० टक्के कपात करण्याचा आपला प्रस्ताव कायम ठेवला आहे. युरोपियन युनियन आणि सदस्य राष्ट्रांच्या राष्ट्रीय स्तरावर निश्चित केलेल्या योगदानाला देखील परिषदेनं मान्यता दिली असून, ब्राझीलमध्ये होणाऱ्या COP30 परिषदेपूर्वी ती सादर केली जाईल, असं यात म्हटलं आहे. २०२१ साली अधिकृतपणे स्वीकारण्यात आलेल्या युरोपियन हवामान कायद्यांतर्गत सर्व सदस्य देशांसाठी दोन प्रमुख, उद्दिष्ट बंधनकारक आहेत. त्यानुसार, २०५० साला पर्यंत हवामान तटस्थता साध्य करणं, आणि १९९० च्या पातळीच्या तुलनेत २०३० साला पर्यंत कार्बन उत्सर्जनात किमान ५५ टक्के इतकी लक्षणीय घट करणं, ही उद्दिष्ट आहेत.

<><><><><>

विश्वचषक विजेत्या महिला क्रिकेट संघातल्या खेळाडूंनी ‘फिट इंडियाचा’ संदेश सर्वत्र पोहोचवावा, तसंच तंदुरुस्त राहण्यासाठी तरुणांना प्रोत्साहित करावं, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. प्रधानमंत्री मोदी यांनी आज दिल्लीतल्या त्यांच्या निवासस्थानी महिला विश्वचषक विजेत्यांची भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते. मोदी यांनी महिला क्रिकेट संघाचं अभिनंदन केलं तसंच सलग तीन पराभवानंतर देखील संघानं स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत जोरदार पुनरागमन केल्याबद्दल कौतुक केलं. मोदी यांनी खेळाडूंना कठोर परिश्रम करत राहण्याचा सल्ला दिला असून प्रधानमंत्री प्रोत्साहनाचा स्रोत असल्याची भावना महिला खेळाडूंनी यावेळी व्यक्त केली.

**<><><><><>**

भारत ऑस्ट्रेलिया पुरूष संघांदरम्यान सुरू असलेल्या टी ट्वेंटी मालिकेतल्या पाच सामन्यांच्या मालिकेतील चौथा सामना आज होत आहे. नाणेफेक जिंकून ऑस्ट्रेलियाने क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार पावणेदोन वाजता खेळ सुरू होईल. दोन्ही संघांनी प्रत्येकी एका सामन्यात विजय मिळवल्यानं मालिकेत १-१ अशी बरोबरी केली आहे.

**<><><><><>**

इजिप्तमध्ये आजपासून सुरू होणाऱ्या आयएसएसएफ जागतिक अजिंक्यपद नेमबाजी स्पर्धेत मनू भाकरच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ सामील होणार आहे. पिस्तुल प्रकारात मनू भाकर, ईशा सिंग आणि सुरूची सिंग देशाचं प्रतिनिधित्व करतील.  रायफल नेमबाजीत, रुद्रांक्ष पाटील, स्वप्नील कुसळे सहभागी होतील, अनुभवी नेमबाज एलाव्हेनिल वलारिवन, सिफ्ट कौर समरा, अर्जुन बाबुता, अनिश भानवाला आणि ऐश्वर्य प्रताप सिंग तोमर यांचाही भारतीय चमूत सहभाग आहे. स्पर्धेत ७२ देशांतील ७२० नेमबाज सहभागी होतील.

**<><><><><>**

बुद्धिबळामध्ये फिडे विश्वचषक स्पर्धेत, भारताच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी केली आहे. ग्रॅण्डमास्टर डी. गुकेश, अर्जून एरिगेसी आणि पेंटला हरिकृष्णा यांनी स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. दीप्तायन घोषने जागतिक विजेता इयान नेपोमनियाला पराभूत करत आश्चर्याचा धक्का दिला. डी. गुकेशने कझाकस्तानच्या खेळाडूचा दीड विरुद्ध अर्धा गुण  असा तर अर्जुनने बल्गेरियाच्या प्रतिस्पर्ध्याचा २विरुद्ध शून्य असा पराभव केला.

**//<><><><><>//**